॥ श्रीनामदेवमहाराजकृत हरिपाठाचे अभंग ॥

१

नामाचा महिमा कोण करी सीमा । जपावें श्रीरामा एका भावें ॥ १ ॥
न लगती स्तोत्रें नाना मंत्रें यंत्रें । वर्णिजे बा वक्त्रें श्रीरामनाम ॥ २ ॥
अनंत पुण्यराशी घडे ज्या प्राण्यासी । तरीच मुखासी नाम येत ॥ ३ ॥
नामा म्हणें नाम महाजप परम । तो देह उत्तम मृत्युलोकीं ॥ ४ ॥

२

जन्माचें कारण रामनामपाठीं । जाइजे वैकुंठीं एकीहेळा ॥ १ ॥
रामनाम ऐसा जिव्हे उमटे ठसा । तो उद्धरेल आपैसा इहलोकीं ॥ २ ॥
दो अक्षरीं राम जप हा परम । नलगे तुज नेम नाना पंथ ॥ ३ ॥
नामा म्हणे पवित्र श्रीरामचरित्र । उद्धरिते गोत्र पूर्वजेंसी ॥ ४ ॥

३

विषयांचे कोड कां करिसी गोड । होईल तुज जोड इंद्रियबाधा ॥ १ ॥
सर्वही लटिकें जाण तूं बा निकें । रामाविण एकें न सुटिजे ॥ २ ॥
मायाजाळ मोहें इंद्रियांचा रोहो । परि न धरेचि भावो भजनपंथें ॥ ३ ॥
नामा म्हणे देवा करीं तूं लावलाही । मयूराचा टाहो घनगर्जना ॥ ४ ॥

४

कांसवीचे दृष्टी जैं येईजे भेटी । तैं अमृताची सृष्टी घडे त्यासी ॥ १ ॥
तैसें हें भजन श्रीरामाचें ध्यान । वाचे नारायण अमृतमय ॥ २ ॥
धन्य त्याचें कुळ सदा पैं सुफळ । दिननिशीं पळ रामनाम ॥ ३ ॥
नामा म्हणे चोखट भक्त तो उत्तम । वाचेसी सुगम रामनाम ॥ ४ ॥

५

सदा फळ सुफळ वाचेसी गोपाळ । वंदी कळिकाळ शास्त्र सांगे ॥ १ ॥
ब्रह्मांडनायक ऐसें जें कौतुक । तेंचि नाम एक श्रीकृष्ण ऐसें ॥ २ ॥
आदि अंत पाहतां नाहीं पैं सर्वथा । परिपूर्ण सरिता अमृताची ॥ ३ ॥
नामा म्हणे अनंत कां करिशी संकेत । उद्धरिले पतित युगायुगीं ॥ ४ ॥

६

गोविंद गोपाळ वाचेसी निखळ । तो उद्धरे तात्काळ कलीमाजी ॥ १ ॥
नारायण नारायण हेंचि पारायण । उद्धरले जन इहलोकीं ॥ २ ॥
तुटती यातना कर्माच्या भावना । जडजीवउद्धारणा नाम स्मरा ॥ ३ ॥
नामा म्हणे राम हा जप परम । न लगती नेम नाना कोटी ॥ ४ ॥

७

तीर्थ जपराशी जप हृषीकेशी । मुखीं अहर्निशीं रामनाम ॥ १ ॥

तीर्थाचें पैं तीर्थ नाम हें समर्थ । होईल कृतार्थ रामनामें ॥ २॥
होईल साधन तुटेल बंधन । वाचे जनार्दन सुफळ सदा ॥ ३॥
नामा म्हणे हरी उच्चार तूं करीं । उद्धरसी निर्धारीं इहलोकीं ॥ ४॥

८

पाहतां ये परिपाटी आणिक नाहीं सृष्टी। नामेंविण दृष्टीं न दिसे माझ्या ॥१॥
नमचि समर्थ नामचि मथित । शंकरासी हेत रामनामीं ॥ २॥
भरती सर्व काम वाचे रामनाम । न लगती ते नेम कर्मजाळ ॥ ३॥
नामा म्हणे उच्चार न करीं तूं विचार । तुटेल येरझार नाना योनी ॥ ४॥

९

तपाचें हें तप राम हें अमूप । करीं का रे जप रामनामीं ॥ १॥
रामकृष्ण म्हणे वाचे नारायण । तुटेल बंधन यमपाश ॥ २॥
साधेल साधन होती कोटी यज्ञ । राम जनार्दन जपे करीं ॥ ३॥
नामा म्हणे जिव्हे नामस्मरण करी । म्हणे नरहरी एक्या भावें ॥ ४॥

१०

हाचि नेम सारीं साधेल तो हरी । नाम हें मुरारी अच्युताचें ॥ १॥
राम गोविंद हरे कृष्ण गोविंद हरे । यादव मोहरे रामनाम ॥ २॥
न लगती कथा नाना विकळता । नामचि स्मरतां राम वाचे ॥ ३॥
नाम म्हणे राम आम्हां हाचि नेम । नित्य तो सप्रेम जप आम्हां ॥ ४॥

११

करूं हें कीर्तन राम नारायण । जनीं जनार्दन हेंचि देखें ॥ १॥
जगाचा जनक रामकृष्ण एक । न करितां विवेक स्मरें राम ॥ २॥
तुटेल भवजाळ कां करिशी पाल्हाळ । सर्व मायाजाळ इंद्रियबाधा ॥ ३॥
नामा म्हणे गोविंद स्मरें तूं सावध । नव्हे तुज बाधा नाना विघ्नें ॥ ४॥

१२

मायेचीं भूचरे रज तम सात्त्विक । रामनाम एक सोडवणें एक ॥ १॥
राम हेंचि स्नान राम हेंचि ध्यान । नामें घडती यज्ञ कोटी देवा ॥ २॥
न लगती साधनें नाना मंत्र विवेक । रामनामीं मुख रंगवी कां रे ॥ ३॥
नामा म्हणे श्रीराम हेंचि वचन आम्हां। नित्य ते पौर्णिमा सोळा कळी ॥ ४॥

१३

माझें मी करितां गेले हे दिवस । न धरीच विश्वास राम नामीं ॥ १॥
अंतीं तुज उद्धरती राम कृष्ण हरी । राम पंचाक्षरी मंत्रसार ॥ २॥
कां करिशी सांठा प्रपंच विस्तार। न तुटे येरझार नामेंविण ॥ ३॥
नामा म्हणे ऐसें रामनामीं पिसें । तो उद्धरेल आपैसें इहलोकीं ॥ ४॥

१४

नको नको माया सांडीं लवलाह्या । पुढील उपाया झोंबें कां रे ॥ १॥
राम नाम म्हणे तुटेल बंधन । भावबंधमोचन एक्या नामें ॥ २॥

स्मरतां पतित उद्धरेल यतार्थ । नाम हाचि स्वार्थ तया झाला ॥ ३॥
नामा म्हणे हा जप करी तूं अमूप । नामें चुके खेप इये जनीं ॥४॥

१५

स्मरण करितां रामनामध्वनी । ऐकतांचि कर्णीं पळती यम ॥ १॥
नामपाठ करा राम कृष्ण हरी । होतील कामारी ऋद्धि सिद्धि ॥ २॥
साध्य तेंचि साधीं न करी उपाधी । जन्मांतरीच्या व्याधी हरती नामें ॥ ३॥
नामा म्हणे सर्व राम हाचि भाव । नाहीं आणिक देव रामेंविण ॥ ४॥

१६

रामकृष्णमाळा घालितां अढळ । तुटेल भवजाळ मायामोह ॥ १॥
होशील तूं साधु न पावती बाधु । पूर्ण ब्रह्मानंदु तुष्टेल तुज ॥ २॥
जपतां रामनाम पुरती सर्व काम । आदि अंति नेम साधेल तुज ॥ ३॥
नामा म्हणे कृतार्थ सर्व मनोरथ । न लगती ते अर्थ मायापाश ॥ ४॥

१७

शरीर संपत्ती मायेचें टवाळ । वायांचि पाल्हाळ मिरवितोसी ॥ १॥
नाम हेचि तारी विठ्ठलनिर्धारीं । म्हणे हरी हरी एक वेळां ॥ २॥
स्मरतां गोपाळनामा वंदितील यम । न लगती नेम मंत्रबाधा ॥ ३॥
नामा म्हणे सार मंत्र तो उत्तम । राम हेंचि नाम स्मरें कां रे ॥ ४॥

१८

कृष्णकथा संग जेणें तुटे पांग । न लगे तुज उद्योग करणें कांहीं ॥ १॥
समर्थ सोयरा राम हा निधान । जनीं जनार्दनीं एक ध्यायी ॥ २॥
नामा म्हणे उच्चार रामकृष्ण सार । तुटेल येरझार भवाब्धीची ॥ ३॥

१९

भवाब्धीतारक रामकृष्ण नांव । रोहिणीची माव सकळ दिसे ॥ १॥
नाम हेंचि थोर नाम हेंचि थोर । वैकुंठीं बिढार रामनामें ॥ २॥
राम हे निशाणी जपतांची अढळ । वैकुंठ तात्काळ तया जीवा ॥ ३॥
नामा म्हणे वैकुंठ नामेंचि जोडेल । अंतीं तुज पावेल राम एक ॥ ४॥

२०

जळाचा जळबिंदु जळींच तो विरे । तैसें हें विधारे पांचाठायीं ॥ १॥
जीव शिव विचार नाम हें मधुर । जिव्हेसी उपचार रामनाम ॥ २॥
रामनाम तारक शिव षडक्षरी । तैची वाचा करीं अरे मूढा ॥ ३॥
नामा म्हणे ध्यान शिवाचें उत्तम । मंत्र हा परम रामनाम ॥ ४॥

२१

करितां हरिकथा नाम सुखराशी । उद्धरी जीवासी एका नामें ॥ १॥
तें हें रामनाम जपे तूं सप्रेम । जप हा सुगम सुफळ सदा ॥ २॥
नामेंचि तरले नामेंचि पावले । नाम म्हणतां गेले वैकुंठासी ॥ ३॥
नामा म्हणे एका नामेंसी विनटे । ते वैकुंठींचे पेठे पावले देखा ॥ ४॥

२२

नामावांचूनि कांहीं दुकें येथें नाहीं । वेगीं लवलाहीं राम जपा ॥ १ ॥
गोविंद गोपाळ वाचेसी रसाळ । पावसी केवळ निजपद ॥ २ ॥
धृव प्रल्हाद बळी अंबऋषि प्रबुद्ध । नामेंचि चित्पद पावले देख ॥ ३ ॥
नामा म्हणे राम वाचे जपा नाम । संसार भवभ्रम हरे नामें ॥ ४ ॥

२३

म्हणतां वाचे नाम वंदी तया यम । काळादिक सम वंदी तया ॥ १ ॥
ऐसें नाम श्रेष्ठ सकळांसी वरिष्ठ । उच्चारितां नीट वैकुंठ गाजे ॥ २ ॥
तो हा नाममहिमा वाखाणीत ब्रह्मा । न कळे तया उपमा आदिअंतीं ॥ ३ ॥
नामा म्हणे पाठें नामाचेनि वाटें । तरी प्रत्यक्ष भेटे विठ्ठल हरी ॥ ४ ॥

२४

विष्णुनाम श्रेष्ठ गाती देवऋषी । नाम अहर्निशी गोपाळाचें ॥ १ ॥
हरी हरि हरि हरि तूंचि बा श्रीहरि । असे चराचरीं जनार्दना ॥ २ ॥
आदिब्रह्म हरि आळवी त्रिपुरारी । उमेप्रति करी उपदेश ॥ ३ ॥
नामा म्हणे नाम महाजप परम । शंकरासी नेम दिनदिशीं ॥ ४ ॥

२५

कां करतोसी सीण वाचे नारायण । जपतां समाधान होईल तुज ॥ १ ॥
राम कृष्ण हरी नारायण गोविंद । वाचेसी हा छंद नामपाठ ॥ २ ॥
वंदील तो यम कळिकाळ सर्वदा । न पावसी आपदा असत देही ॥ ३ ॥
नामा म्हणे ओळंग शीण झाला संगें । प्रपंच वाउगे सांडी परते ॥ ४ ॥

२६

नामाचेनि पाठे जातील वैकुंठें । तो पुंडलीक पेठे प्रकट असे ॥ १ ॥
विठ्ठल हा मंत्र सांगतसे शास्त्र । आणिक नाही शस्त्र नामाविण ॥ २ ॥
पुराण व्युत्पत्ति न लगती श्रुती । मुनि हरिपंथी गेले ॥ ३ ॥
नामा म्हणे हरी नामेंचि उद्धरी । जन्माची येरझारी हरे नामें ॥ ४ ॥

२७

सर्वांभूतीं भजें नमन करीं संता । नित्य त्या अच्युता स्मरण करी ॥ १ ॥
ऐसी भजनी विनट सांपडेल वाट । रामकृष्ण नीट वैकुंठींची ॥ २ ॥
न लगतीं साधनें वायाचि बंधन । हरिनामपंथीं जाण मुनि गेले ॥ ३ ॥
नामा म्हणे थोर नामचि साधार । वैकुंठीं बिढार तयां भक्ता ॥ ४ ॥

२८

तूं तव नेणता परि हरि तो जाणता । आहे तो समता सर्वां भूतीं ॥ १ ॥
सर्वब्रह्म हरि एकचि निर्धारी । होशी झडकरी ब्रह्म तूंचि ॥ २ ॥
अच्युत माधव अमृताच्या पाठें । लागतांचि वाते वंदी यम ॥ ३ ॥
नामा म्हणे होशी जिवलग विष्णूचा । दास त्या हरीचा आवडता ॥ ४ ॥

२९

कां करिसी सोस मायेचा असोस । नव्हे तुझा सौरस नामेंविण ॥ १ ॥
नामचेचि मंत्र नामचेचि तंत्र । नामविण पवित्र न होती देखा ॥ २ ॥
तिहीं लोकीं काहीं नामेंविण सर्वथा । अच्युत म्हणतां पुण्यकोटी ॥ ३ ॥
नामा म्हणे ब्रह्म आदि अंतीं नेम । तें विटेवरी सम उभें असे ॥ ४ ॥

३०

पवित्र परिकर हा उच्चार । उद्धरण साचार जगासी या ॥ १ ॥
गोविंद केशव उच्चारीं श्रीराम । न लगती नेम अमूप जप ॥ २ ॥
तें हें विठ्ठलरूप पिकलें पंढरीं । नाम चराचरीं विठ्ठल ऐसें ॥ ३ ॥
नामा म्हणे विठ्ठल सर्वांत सखोल । उच्चारितां मोल न लगे तुज ॥ ४ ॥

३१

पोशिसी शरीर इंद्रियांची बाधा । शेखीं तें आपदा करील तुज ॥ १ ॥
नव्हे तुझें हित विषय पोषितां । हरी हरी म्हणतां उद्धरसी ॥ २ ॥
वायांचि पाल्हाळ चरित्रु सांगसी । परी नाम न म्हणसी अरे मूढा ॥ ३ ॥
नामा म्हणे हेचि पंढरीये निधान । उच्चारिता जन तरले ऐसें ॥ ४ ॥

३२

विषय खटपट आचार सांगसी । विठ्ठल न म्हणसी अरे मूढा ॥ १ ॥
पूर्णब्रह्म हरी विठ्ठल श्रीहरी । अंतीं हा निर्धारीं तारील सत्य ॥ २ ॥
न लगे सायास करणें उपवास । नामाचा विश्वास ऐसा धरीं ॥ ३ ॥
नामा म्हणे प्रेम धरीं सप्रेम । विठ्ठल हाचि नेम दिनदिशीं ॥ ४ ॥

३३

नव्हे तुज हित म्हणतां विषय पोषिता । हरी हरी म्हणतां तरशील ॥ १ ॥
माधव श्रीहरी कृष्ण नरहरी । वेगीं हें उच्चारीं लवलाहीं ॥ २ ॥
घडतील यज्ञ पापें भग्न होत । प्रपञ्च सर्वत्र होईल ब्रह्म ॥ ३ ॥
नामा म्हणे हरिकथा हरी भवव्यथा । उद्धरसी सर्वथा भाक माझी ॥ ४ ॥

३४

उपदेश सुगम आइके रे एक । नाम हें सम्यक विठ्ठलाचें ॥ १ ॥
जनीं जनार्दन भावचि संपन्न । विठ्ठल उद्धरण कलीमाजीं ॥ २ ॥
साधेल निधान पुरेल मनोरथ । नामेंचि कृतार्थ होसी जनीं ॥ ३ ॥
नामा म्हणे नाम घेई तूं झडकरी । पावशी निर्धारीं वैकुंठपद ॥ ४ ॥

॥ इति श्रीनामदेव हरिपाठ समाप्त ॥

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 25, 1999